पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक २५/०४/२०१८

# वार्तापत्र

काल दिनांक २४/०४/२०१८ रोजी शोध मोहीमे दरम्यान १५ नक्षल मृतदेह इंद्रावती नदी पात्रात मिळुन आले होते. परंतु रात्र झाल्याने शोध मोहीम थांबविण्यात आली होती. आज सकाळी दिनांक २५/०४/२०१८ रोजी पुन्हा शोध मोहीम सुरु केली असता इंद्रावती नदी पात्रात ०२ नक्षल मृतदेह कुजलेल्या अवस्थेत मिळुन आले तसेच इंद्रावती नदी पात्रात मगरींचे वास्तव्य असल्यामुळे काही नक्षल मृतदेहांच्या शरीराचे अवशेष मिळुन आले आहेत.

कसनासुर जंगल परिसरातील मृत नक्षलवादयांची संख्या आता ३३ झाली असुन मौजा नैनेर चकमकीतील ०६ नक्षलवादी मिळुन मृतांचा आकडा ३९ झाला आहे. त्यापैकी १८ नक्षलवादयांची ओळख पटली असुन मृत नक्षलवादयांपैकी ०९ जणांचे मृतदेह त्यांचे नातेवाईकांचे ताब्यात देण्यात आले आहे. सदर भागात शोध मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे.